## GS 2 - Point No. 1.10 - घटनादुरुस्तीची प्रक्रिया आणि भारतीय संविधानातील आजवरच्या प्रमुख घटना दुरुस्त्या

### घटनादुरुस्ती - कलम 368

भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्तीची प्रक्रिया प्रकरण 20 व कलम 368 मध्ये सांगितलेली आहे. ब्रिटनमधील घटनादुरुस्तीची प्रक्रिया सोपी आहे व अमेरिकेतील घटनादुरुस्तीची प्रक्रिया ताठर आहे. भारतीय राज्यघटना अगदी लवचीक व अगदी ताठर नसून ती दोघांचे मिश्रण आहे.

कलम 368 (1) नुसार घटनादुरुस्ती ची शक्ती हि संसदेची संविधाईक शक्ती (constituent power) आहे. संसद घटनेतील कोणत्याही तरतुदींमध्ये बदल करू शकते, भर घालू शकते किंवा एखादी तरतूद काढून टाकू शकते. मात्र संसदेला घटनेच्या मूलभूत चौकटीत बदल करता येणार नाही. असे न्यायालयाने केशवानंद भारती खटल्यात नमूद केले आहे.

**घटनादुरुस्तीची प्रक्रिया -**

- कलम 368 (2) नुसार घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते.
- मंत्री किंवा खाजगी सदस्य घटना दुरुस्ती विधेयक मांडू शकतो.
- अश्या विधेयकास राष्ट्रपतीच्या पुर्वसंमतीची गरज नसते.
- घटनादुरुस्ती विधेयक दोन्ही सभागृहात स्वतंत्रपणे आणि विशेष बहुमताने पारीत होणे आवश्यक असते.
- दोन्ही सभागृहात मतभेद झाल्यास संयुक्त बैठकीची तरतूद नाही.
- राष्ट्रपतींकडे गेल्यास त्यांना सहमती द्यावीचे लागते (24 वी घटनादुरुस्ती)

**घटनेत तीन प्रकारे दुरुस्ती करता येते**

1. संसदेच्या साध्या बहुमताने
2. संसदेच्या विशेष बहुमताने
3. संसदेचे विशेष बहुमताने + निम्म्या राज्यांचे साधे बहुमताने समर्थन

**1. साध्या बहुमताने घटनादुरुस्ती (Type 1) -**

या घटनादुरुस्तीस कलम 368 च्या बाहेरील दुरुस्ती असे म्हटले जाते. साध्या बहुमताने खालील दुरूस्त्या केल्या जातात.

i. नवीन राज्य निर्मिती
ii. राज्यांच्या क्षेत्रफळ, सीमा, नावात बदल
iii. विधान परिषद निर्मिती /नष्ट करणे.
iv. दुसरे परिशिष्ट
v. संसदेतील गणपूर्ती
vi. खासदारांचे पगार
vii. संसदेच्या कामकाजाचे नियम
viii. संसद, संसद सदस्य व संसदीय समित्या यांचे विशेषाधिकार
ix. संसदेत इंग्रजी भाषेचा वापर
x. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधिशांची संख्या
xi. सर्वोच्च न्यायालयावर अधिक जवाबदारी देणे
xii. अधिकृत भाषेचा वापर
xiii. नागरिकत्व
xiv. संसद आणि राज्य विधिमंडळ यांच्या निवडणुका

Swadhyay e Learning

xv. मतदारसंघांचे परिसीमन
xvi. केंद्रशासित प्रदेश
xvii. पाचवे परिशिष्ट
xviii. सहावे परिशिष्ट

**2. संसदेच्या विशेष बहुमताने घटनादुरुस्ती (Type 2) -**

विशेष बहुमत - दोन्ही सभागृहामध्ये (स्वतंत्ररित्या) सभागृहांच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश इतक्या सदस्यांच्या बहुमताने विधेयक मंजुर करणे. खरे तर असे विशेष बहुमत फक्त तिसऱ्या वाचनात लागते. पण सभागृह नियमांनुसार प्रत्येक वेळी लागते. विशेष बहुमताने खालील दुरुस्त्या केल्या जातात.

i. मूलभूत हक्क
ii. मार्गदर्शक तत्त्वे
iii. पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारात समाविष्ट नसलेल्या इतर तरतूदी.

**3. संसदेचे विशेष बहुमत + निम्म्या राज्यांच्या साध्या बहुमताने घटनादुरुस्ती (Type 3) -**

दोन्ही सभागृहाचे विशेष बहुमत + निम्म्या राज्यांचे साधे बहुमत मात्र या प्रकारात राज्यांवर त्या विधेयकास समर्थन देण्यासाठी कोणत्याही कालावधीचे बंधन नाही. या प्रकारच्या विशेष बहुमताने खालील दुरुस्त्या केल्या जातात.

i. राष्ट्रपतींची निवडणूक पध्दत
ii. केंद्र व घटकराज्यांच्या कार्यकारी अधिकारांची व्याप्ती
iii. सर्वोच्च व उच्च न्यायालये
iv. केंद्र व घटकराज्यांच्या विधायीकी शक्तीचे विभाजन
v. वस्तू आणि सेवा कर परिषद
vi. सातव्या परिशिष्टातील विषय
vii. संसदेत राज्यांचे प्रतिनिधीत्व
viii. कलम 368 (घटनादुरुस्ती ची शक्ती व प्रक्रिया) मध्ये बदल

**आजवरच्या प्रमुख घटना दुरुस्त्या**

| घटना दुरुस्ती | घ.दु. विधेयक | वर्ष | राष्ट्रपती | पंतप्रधान | माहिती |
|---|---|---|---|---|---|
| **1** | 1 | 1951 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • कलम 31 'A' आणि 31 'B' यांचा समावेश केला.<br>• सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार राज्यसंस्थेला दिला.<br>• मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी तरतुदी असणारे कायदे, जमीन सुधारणा आणि इतर कायद्यांचे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षण करण्यासाठी 9 व्या परिशिष्टाचा सामावेश.<br>• भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालणाऱ्या तीन आधारांचा उदा. सार्वजनिक सुव्यवस्था, परराष्ट्रांसोबत मैत्रीपूर्ण संबंध आणि गुन्ह्याला उत्तेजन देणे. इ. बाबींचा समावेश, ह्या मर्यादा 'वाजवी' असतील, म्हणून न्यायप्रविष्ट असतील.<br>• राज्यसंस्थेने कोणताही व्यापार व उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास त्यामुळे व्यापार आणि उद्योग करण्याच्या अधिकारांचा भंग होतो, |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | या आधारावर ती कृती अवैध ठरविता येणार नाही. |
| **2** | 2 | 1952 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • लोकसभेचा एक सदस्य 7 लाख 50 हजारांपेक्षा अधिक लोकांचे प्रतिनिधीत्व करेल याद्धतीने लोकसभेतील प्रतिनिधीत्वाच्या प्रमाणाची पुनर्रचना. |
| **4** | 4 | 1955 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • खाजगी मालमत्तेची अनिवार्यपणे प्राप्ती केल्यानंतर देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईचे प्रमाण ठरविले आणि ही बाब न्यायालयाच्या न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेबाहेर ठेवली.<br>• कोणताही व्यापार राष्ट्रीयीकृत, करण्याची राज्यसंस्थेला सत्ता बहाल केली.<br>• 9 व्या परिशिष्टामध्ये आणखी काही कायदे समाविष्ट केले.<br>• कलम 31 'A' व्याप्ती वाढविली. |
| **7** | 6 | 1956 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अस्तित्वात असलेले राज्यांचे वर्गीकरण, उदा.भाग अ, ब, क, आणि ड, रद्द करण्यात येऊन 14 घटकराज्ये आणि 6 केंद्रशासित प्रदेशांना मान्यता दिली.<br>• केंद्रशासित प्रदेशांपर्यंत उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रामध्ये वाढ करण्या आली.<br>• दोन वा अधिक घटकराज्यांसाठी सामाईक उच्च न्यायालयाची स्थापना करणे.<br>• उच्च न्यायालयाच्या सहाय्यक आणि हंगामी न्यायाधीशांची नियुक्ती. |
| **8** | 8 | 1960 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली. (1970 पर्यंत) |
| **9** | 9 | 1960 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • भारत - पाकिस्तान करारनाम्यानुसार (1958) बेरुबारी संघाचा (पं.बंगालमधील) भारतीय भूप्रदेश पाकिस्तानमध्ये विलीन केला. |
| **10** | 10 | 1961 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • भारतीय संघव्यवस्थेत दादरा आणि नगर हवेलीचा समावेश केला. |
| **11** | 11 | 1961 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक घेण्याऐवजी स्वतंत्र निर्वाचन मंडळाची तरतूद करुन उपराष्ट्रपती पदाच्या निवडणूक प्रक्रियेत बदल केला.<br>• निर्वाचन मंडळामध्ये रिक्त असलेल्या जागेच्या आधार राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीला आव्हान देता येणार नाही. |
| **12** | 12 | 1962 | राजेंद्र प्रसाद | जवाहर लाल नेहरू | • भारतीय संघव्यवस्थेत गोवा, दमण आणि दीव यांचा समावेश केला. |
| **15** | 15 | 1963 | सर्वपल्ली राधाकृष्णन | जवाहर लाल नेहरू | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• एखादी कृती, गुन्हा, कृत्य एखाद्या उच्च न्यायालयाच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रात घडलेले असेल तर त्या संबंधातील खटल्याच्या न्यायनिवाड्यात उच्च न्यायालयास त्या भौगोलिक क्षेत्राबाहेरील कोणत्याही व्यक्तीला, वा अधिसत्तेला न्यायालीयन आदेश बजावू शकते. |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | • उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचे निवृत्ती वय 60 वरुन 62 करण्यात आले.<br>• उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीशाला त्याच उच्च न्यालयात हंगामी न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्याची तरतूद.<br>• एका उच्च न्यायालयातून दुसऱ्या उच्च न्यायालयामध्ये बदली केलेल्या न्यायाधीशाला हानीपुरक भत्ता देण्याची तरतूद.<br>• उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचा तदर्थ न्यायाधीश म्हणून कार्य करु शकतो.<br>• सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वय निश्चितीची कार्यपद्धती. |
| **21** | 21 | 1967 | सर्वपल्ली राधाकृष्णन | इंदिरा गांधी | • 8 व्या परिशिष्टामध्ये 15 वी भाषा म्हणून सिंधी भाषेचा समावेश केला. |
| **23** | 23 | 1969 | व्ही. व्ही. गिरी | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• लोकसभा आणि राज्यांच्या विधान सभांमध्ये अनुसूचित जाती आणि जमाती तसेच आंग्ल-भारतीय समाजाच्या प्रतिनिधत्वासाठी आरक्षित जागांची मुदत आणखी 10 वर्षाकरिता वाढविली. (1980 पर्यंत) |
| **24** | 24 | 1971 | व्ही. व्ही. गिरी | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• मूलभूत हक्कांसह राज्यघटनेतील कोणत्याही भागामध्ये दुरुस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकाराचा पुनरुच्चार<br>• घटनादुरुस्ती विधेयकाला संमती देण्याचे राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आले |
| **31** | 31 | 1972 | व्ही. व्ही. गिरी | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• लोकसभेतील सदस्य संख्येत वाढ करुन ती 525 वरुन 545 करण्यात आली. |
| **35** | 36 | 1974 | फक्रुद्दीन अहमद आली | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• सिक्कीम या राज्याचा 'संरक्षणात्मक' हा दर्जा संपुष्टात आणला आणि तिला भारतीय संघशासनाच्या 'सहकारी' राज्याचा दर्जा देण्यात आला.<br>• सिक्कीम राज्याचे भारतासोबत सहकारीत्व कोणत्या नियम वा अटींनुसार असेल, याबाबतची नोंद करुन 10 वे परिशिष्ट निर्माण करण्यात आले. |
| **36** | 38 | 1975 | फक्रुद्दीन अहमद आली | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• सिक्कीमला भारतीय घटकराज्याचा दर्जा देण्यात आला आणि 10 वे परिशिष्ट वगळण्यात आले. |
| **38** | 39 | 1975 | फक्रुद्दीन अहमद आली | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• राष्ट्रपतीने न्यायप्रविष्ट नसणाऱ्या आणीबाणीची घोषणा केली.<br>• राष्ट्रपती, राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासकांनी जारी केलेले आदेश न्यायप्रविष्ट असणार नाहीत.<br>• एकाचवेळी भिन्न भिन्न आधारांवर राष्ट्रपती राष्ट्रीय आणीबाणीसंदर्भात घोषणा करु शकतो. |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **41** | 42 | 1976 | फक्रुद्दीन अहमद आली | इंदिरा गांधी | • राज्य लोकसेवा आयोग आणि संयुक्त लोक सेवा आयोगाच्या सदस्यांचे निवृत्ती वय 60 वरुन 62 केले. |
| **42** | 44 | 1976 | फक्रुद्दीन अहमद आली | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• (या घटनादुरुस्तीने स्वर्णसिंह समितीच्या शिफारशींना मूर्तरुप दिले. या घटनादुरुस्तीला Mini constitution म्हणून ओळखले जाते.)<br>• सरनाम्यामध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता या तीन नवीन शब्दांचा समावेशे केला.<br>• नागरिकांसाठी मूलभूत कर्तव्ये हा नवा भाग समाविष्ट केला.<br>• राष्ट्रपतीने मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच कारभार करण्याचे बंधनकारक केले.<br>• प्रशासकीय न्यायासन आणि इतर विषयांसाठी न्यायासनांची तरतूद.<br>• घटनादुरुस्त्या ह्या न्यायालयीन पुनरावलोकनाच्या कक्षे बाहेर ठेवल्या.<br>• न्यायालयीन पुनर्विलोकन आणि सर्वोच्च व उच्च न्यायालयाचा आदेश अधिकारक्षेत्राचा संकोच केला.<br>• लोकसभा आणि विधानसभा यांचा कार्यकाळ 5 वरुन 6 वर्षे करण्यात आला.<br>• मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी केलेल्या कायद्यांमुळे काही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होते, या आधारावर (कारणास्तव) न्यायालयाने त्यांना अवैध घोषित करु शकत नाहीत.<br>• देशविघातक कारवायांना हाताळण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आणि अशा कायद्यांचे मूलभूत हक्कांवर देखील श्रेष्ठत्व असेल.<br>• तीन नवीन मार्गदर्शक तत्त्वांची भर घालण्यात आली. उदा- समान न्याय आणि मोफत कायदेशीर मदत; उद्योगांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांचा सहभाग आणि पर्यावरण, जंगले व प्राण्यांचे संरक्षण.<br>• भारताच्या कोणत्याही भागामध्ये राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा करणे सुकर केले.<br>• घटक राज्यातील राष्ट्रपती एकवेळ (सलग) कालावधी 6 महिन्यांवरुन 1 वर्ष करण्यात आला.<br>• कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती हाताळण्यासाठी कोणत्याही राज्यात सशस्त्र दलांची तैनाती करण्याचे अधिकार केंद्राला दिले.<br>• राज्यसूचीतील 5 विषय समवर्तीसूची मध्ये स्थानांतरित केले. उदा.शिक्षण, जंगले, जंगली प्राणी आणि पक्ष्यांचे संरक्षण, वजन आणि मापे आणि न्यायाचे प्रशासन, सर्वोच्च आणि उच्च न्यायालये वगळता इतर सर्व न्यायालयांची स्थापना आणि संरचना इ.<br>• संसद आणि राज्यविधिमंडळातील गणसंख्येची आवश्यकता रद्द केली.<br>• संसदेचे सदस्य आणि तिच्या समित्यांचे हक्क आणि विशेषाधिकार वेळोवेळी निश्चित करण्याचे अधिकार संसदेला दिले.<br>• अखिल भारतीय न्यायिक सेवेच्या निर्मितीसाठी तरतूद. |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **44** | 45 | 1978 | नीलम संजीव रेड्डी | मोरारजी देसाई | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• (जनता पार्टी सरकारने 42व्या घटनादुरुस्तीने केलेले बदल रद्द करण्यासाठी हि घटनादुरुस्ती केली)<br>• लोकसभा आणि विधानसभांचा मूळ कार्यकाळ (5 वर्षे) पुनर्स्थापित केला.<br>• लोकसभा आणि राज्य विधिमंडळाच्या गणसंख्येची तरतूद पुनर्स्थापित केली.<br>• संसदीय विशेषाधिकाराबाबत ब्रिटिशांच्या सामान्यगृहाचा संदर्भ वगळण्यात आला.<br>• संसद आणि राज्यविधिमंडळामध्ये चालणाऱ्या कार्यपद्धतीचे खरे वार्तांकन वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध (प्रकाशित) करण्यास घटनात्मक संरक्षण दिले.<br>• मंत्रिमंडळाचा सल्ला पुनर्विचारार्थ केवळ एकदा परत पाठविण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिला. परंतु पुनर्विचार करुन दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आला.<br>• वटहुकूम जारी करण्यासाठी राष्ट्रपती, राज्यपाल आणि प्रशासक यांच्या समाधानाची तरतूद रद्द केली.<br>• सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे काही अधिकार पुनर्स्थापित केले.<br>• राष्ट्रीय आणिबाणीच्या संदर्भात 'अंतर्गत अशांतता' या शब्दाऐवजी 'सशस्त्र बंडळी' हा शब्द योजण्यात आला.<br>• कॅबिनेटने केवळ लेखी स्वरुपात शिफारस केल्यानंतरच राष्ट्रपती 'राष्ट्रीय आणीबाणी' घोषित करु शकतात अशी तरतूद केली.<br>• राष्ट्रीय आणीबाणी आणि राष्ट्रपती राजवटीबाबत काही ठराविक प्रक्रियात्मक संरक्षक तरतुदी केल्या.<br>• मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कांच्या यादीतून रद्द केला आणि तो केवळ कायदेशीर हक्क केला.<br>• कलम 20 आणि 21 अन्वये हमी दिलेले मूलभूत हक्क राष्ट्रीय आणीबाणीमध्ये तहकूब होणार नाहीत.<br>• 'राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पतंप्रधान आणि लोकसभेचा सभापती यांच्या निवडणूक वादाबाबत न्यायालये निर्णय देऊ शकत नाहीत, ही तरतूद वगळण्यात आली. |
| **45** | 45 | 1980 | नीलम संजीव रेड्डी | इंदिरा गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली . (1990 पर्यंत) |
| **48** | 50 | 1984 | झैल सिंग | इंदिरा गांधी | • पंजाबमध्ये राष्ट्रपती राजवटीचा कालावधी 1 वर्षापुढे वाढविण्यात आला. मुदतवाढीसाठी आवश्यक असलेल्या दोन विशेष अटींची पूर्तता न करताच ही मुदतवाढ देण्यात आली. (exception) |
| **52** | 52 | 1985 | झैल सिंग | राजीव गांधी | • (पक्षांतरबंदी कायदा म्हणून परिचित)<br>• लोकसभा आणि राज्यविधिमंडळातील सदस्यांना पक्षांतराच्या आधारे अपात्र ठरविण्याची तरतूद करण्यात आली. तसेच |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | यासंदर्भात विस्तृत माहिती देणाऱ्या 10 व्या परिशिष्टाचा समावेश केला.<br>• (आधीचे अस्थित्वात असलेले 10वे परिशिष्ट 36व्या घटनादुरुस्तीने रद्द केले होते) |
| **58** | 56 | 1987 | आर. वेंकटरमण | राजीव गांधी | • राज्यघटनेची हिंदी भाषेतील प्रमाणित संहिता पुरविण्यात आली आणि राज्यघटनेच्या हिंदीतील भाषांतराला कायदेशीर मान्यता दिली. |
| **61** | 62 Bill of 1988 | 1989 | आर. वेंकटरमण | राजीव गांधी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकींमध्ये मतदारांचे वय 21 वरुन 18 वर्षे करण्यात आली. |
| **62** | 62 Bill of 1989 | 1989 | आर. वेंकटरमण | व्ही. पी. सिंग | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली . (2000 सालापर्यंत) |
| **69** | 74 | 1991 | आर. वेंकटरमण | पी. व्ही. नरसिंहराव | • दिल्ली राष्ट्रीय राजधानी भूप्रदेश' अशी पुनर्रचना करुन दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला विशेष दर्जा दिला.<br>• या घटनादुरुस्तीने दिल्लीसाठी 70 सदस्यीय विधानसभा आणि 7 सदस्यीय मंत्रिमंडळांचीदेखील तरतूद केली. |
| **70** | 76 | 1992 | आर. वेंकटरमण | पी. व्ही. नरसिंहराव | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• 'राष्ट्रीय राजधानीचा भूप्रदेश' असलेल्या दिल्ली आणि पाँडिचेरी या केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभा सदस्यांचा समावेश राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी असलेल्या निर्वाचन मंडळामध्ये करण्यात आला. |
| **71** | 78 | 1992 | शंकर दयाळ शर्मा | पी. व्ही. नरसिंहराव | • कोकणी, मणिपुरी आणि नेपाळी या भाषांचा 8 व्या परिशिष्टामध्ये समावेश करण्यात आला. यामुळे अनुसूचित भाषांची एकूण संख्या 18 झाली. |
| **73** | 72 | 1992 | शंकर दयाळ शर्मा | पी. व्ही. नरसिंहराव | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा आणि संरक्षण मंजूर केले.<br>• याकरिता घटनेमध्ये भाग 9 चा 'पंचायत' या शीर्षकाअंतर्गत समावेश करण्यात आला.<br>• याशिवाय नव्या 11 व्या' परिशिष्टामध्ये पंचायतीच्या 29 कार्यात्मक बाबींचा समावेश केला. |
| **74** | 73 | 1992 | शंकर दयाळ शर्मा | पी. व्ही. नरसिंहराव | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• शहरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा आणि संरक्षण देण्यात आले.<br>• याकरिता घटनेमध्ये भाग 9'A' चा 'नगरपालिका' या शीर्षकाअंतर्गत समावेश करण्यात आला.<br>• याशिवाय, नव्या '12 व्या' परिशिष्टामध्ये नगरपालिकांच्या 18 कार्यात्मक बाबींचा समावेश केला. |
| **79** | 84 | 1999 | के. आर. नारायणन | अटल बिहारी वाजपेयी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली . (2010 सालापर्यंत) |
| **83** | 86 | 2000 | के. आर. नारायणन | अटल बिहारी वाजपेयी | • अरुणाचल प्रदेशमध्ये अनुसूचित जातींसाठी पंचायतींमध्ये आरक्षण देण्याची आवश्यकता नाही. संपूर्ण राज्याची लोकसंख्या ही आदिवासी असून तेथे अनुसूचित जाती नाहीत. |
| **84** | 91 | 2001 | के. आर. नारायणन | अटल बिहारी वाजपेयी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमधील सदस्य संख्या पुढील 25 वर्षांकरिता (2026 पर्यंत) पुनर्रचित लोकसभा आणि विधानसभा आणि विधानसभांमधील सदस्य संख्या तीच (2001 पूर्वीची) राहणार आहे.<br>• 1991 च्या जनगणनेच्या आधारे राज्यांमधील भौगोलिक मतदार संघांची पुनर्रचना करण्याची तरतूद केली. यापूर्वी 1971 ची जनगणना आधारभूत मानली होती. |
| **86** | 93 | 2002 | ए. पी. जे. अब्दुल कलाम | अटल बिहारी वाजपेयी | • प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत हक्कामध्ये समावेश केला.<br>• यानुसार समाविष्ट केलेले कलम 21 'A' म्हणते, "राज्यसंस्था तिने निश्चित केलेल्या रीतीने 6 ते 14 वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण पुरवेल"<br>• मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम 45 च्या विषयामध्ये बदल केला. त्यानुसार, "सर्व मुलांच्या वयाची 6 वर्ष पूर्ण होईपर्यंत राज्यसंस्था त्यांना प्रारंभिक बाल्यावस्थेत संगोपन आणि शिक्षण पुरविण्याचा प्रयत्न कर्तव्य करेल"<br>• कलम 51-'A' अंतर्गत नवीन मूलभूत कर्तव्य (11वे) समाविष्ट करण्यात आले. त्यानुसार, "6 ते 14 वयोगटातील मुला-मुलींचे आईवडील वा पालक असणाऱ्या सर्व भारतीय नागरिकांचे हे कर्तव्य असेल की, त्यांनी आपल्या मुलांना वा पाल्याला शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी" |
| **87** | 96 | 2003 | ए. पी. जे. अब्दुल कलाम | अटल बिहारी वाजपेयी | • 1991 च्या जनगणनेऐवजी (84 वी घटनादुरुस्ती) 2001 सालच्या जनगणनेच्या आधारे भौगोलिक मतदार संघाची पुनर्रचना करण्यात यावी. |
| **88** | 95 | 2003 | ए. पी. जे. अब्दुल कलाम | अटल बिहारी वाजपेयी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• सेवा कराबाबत (कलम 268 'A') तरतूद केली. केंद्राकडून सेवांकर कर लादले जातात. परंतु, त्याची वसुली आणि वितरण संसदेने ठरवून दिलेल्या तत्त्वाप्रमाणे कंद्र आणि राज्यामध्ये केले जाते.<br>• परंतु 101व्या घटना दुरुस्तीने कलम 268 A रद्द करण्यात आले. |
| **91** | 97 | 2003 | ए. पी. जे. अब्दुल कलाम | अटल बिहारी वाजपेयी | • मंत्रीमंडळाचा आकार मर्यादित ठेवणे, सार्वजनिक पदे धारण करण्यापासून, पक्षांतर करणाऱ्यांना रोखणे आणि पक्षांतर बंदी कायदा बळकट करणे या उद्देशाकरिता पुढील तरतूदी केल्या.<br>• पंतप्रधानांसहित, केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्र्यांची एकूण संख्या लोकसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या 15 टक्क्यांपेक्षा अधिक असू नये.<br>• संसदेच्या दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहातील, |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्याला पक्षांतरामुळे अपात्र घोषित केले असेल तर, त्या व्यक्तीला मंत्रिपदी नियुक्त करु नये.<br>• मुख्यमंत्र्यांसहित, राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या संबंधित राज्याच्या विधानसभेतील एकूण सदस्य संख्येच्या 15 टक्क्यांपेक्षा अधिक असू नये. परंतु, मुख्यमंत्र्यांसहित, एकूण मंत्र्यांची संख्या 12 पेक्षा कमी असू नये.<br>• राज्य विधिमंडळाच्या सभागृहांपैकी कोणत्याही सभागृहातील, कोणत्याही राजकीय पक्षाच्या सदस्याला पक्षांतरामुळे अपात्र घोषित केले असेल तर, त्या व्यक्तीला मंत्रिपदी नियुक्त करु नये.<br>• संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या सदस्यांपैकी, कोणत्याही पक्षाचा सदस्य असणाऱ्या पक्षांतराच्या, आधारे अपात्र घोषित केलेले असेल तर, तिला इतर कोणतेही मोबदलाप्राप्त राजकीय पद भूषविता येणार नाही.<br>• 10 व्या परिशिष्टामधील पक्षांतरबंदी कायद्यामध्ये तरतूद केली होती की, विधिमंडळीय (मूळच्या) पक्षापासून विभक्त झाल्यास ते पक्षांतरामुळे अपात्र ठरणार नाहीत.<br>• या घटनादुरुस्तीने ही तरतूद रद्द केली. याचाच अर्थ, पक्षांतर करणाऱ्यांना फुटीचा आधार घेऊन कोणतेही संरक्षण उपलब्ध नाही. |
| **92** | 100 | 2003 | ए. पी. जे. अब्दुल कलाम | अटल बिहारी वाजपेयी | • 8 व्या परिशिष्टामध्ये आणखी चार भाषांचा समावेश करण्यात आला. त्या भाषा - बोडो, डोग्री (डोंगरी), मथिली (मैथिली) आणि संथाळी होत. अशाप्रकारे घटनेची मान्यता असलेल्या भाषांची संख्या 22 झाली. |
| **95** | 109 | 2009 | प्रतिभा पाटील | मनमोहन सिंग | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती, जमाती आणि आंग्ल-भारतीय समुदायाची लोकसभा आणि विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली . (2020 सालापर्यंत) |
| **96** | 113 | 2011 | प्रतिभा पाटील | मनमोहन सिंग | • राज्यघटनेच्या 8 व्या परिशिष्टातील (भाषा) 15 क्रमांकाच्या 'ओरिया' (Oriya) या शब्दाऐवजी 'उडिया/ओडिया' (Odia) हा शब्द या घटनादुरुस्तीने नमूद करण्यात आला. |
| **97** | 111 | 2011 | प्रतिभा पाटील | मनमोहन सिंग | • या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे, राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातील कलम 19 (1) खंड (C) मध्ये 'वा संघ' या शब्दानंतर 'वा सहकारी संस्था' (Or Co-operative Societies) हा शब्द समाविष्ट करण्यात आला.<br>• राज्यघटनेच्या चौथ्या भागातील कलम 43 (A) नंतर नव्याने 'कलम 43 (B) नुसार, 'राज्यसंस्था सहकारी संस्थांची (Societies) ऐच्छिक निर्मिती, स्वायत्त कार्यप्रवणता, लोकशाही नियंत्रण आणि व्यावसायिक व्यवस्थापन करण्याकरिता प्रोत्साहन देईल', असे नमूद केले आहे.<br>• राज्यघटनेतील 9'A' या भागानंतर 'The Co-operative Societies' 9 'B' हा नवीन भाग समाविष्ट करण्यात आला.<br>• या भागामध्ये कलम 243 ZH ते कलम 243 ZT इत्यादी कलमांचा |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | समावेश आहे.<br>• मात्र, सुप्रीम कोर्टाने 20 जुलै 2021 रोजी भाग 9 'B' अंतर्गत येणाऱ्या राज्यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सहकारी संस्थाशी संबधित तरतुदी रद्दबातल ठरवल्या आहेत (multi state co operatives सोडून) |
| **98** | 118 | 2012 | प्रणब मुखर्जी | मनमोहन सिंग | • या घटनादुरुस्तीद्वारे घटनेत एक नवीन कलम 371J हे समाविष्ट करण्यात आले. त्याद्वारे कर्नाटक राज्यासाठी 'हैद्राबाद-कर्नाटक' प्रदेशासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यांनसार राष्ट्रपती आदेशाद्वारे राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी टाकू शकतात.<br>• आता या भागाचे नामांतर 'कल्याण कर्नाटक' असे केले आहे |
| **99** | 121 | 2014 | प्रणब मुखर्जी | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• 'राष्टीय न्यायिक नेमणुक आयोग' NJAC करण्यासाठी घटनादुरुस्ती करण्यात आली.<br>• ऑगस्ट 2014 मध्ये संसदेने पारित केल्यानंतर व डिसेंबर 2014 मध्ये राष्ट्रपतींची संमती प्राप्त झाल्यानंतर 13 एप्रिल 2015 रोजी ही घटनादुरुस्ती अंमलात आली.<br>• मात्र 16 ऑक्टोबर, 2015 रोजी सर्वोच्च न्यायालयाने ही घटनादुरुस्ती घटनाविरोधी असल्याचा निर्णय देऊन बाद ठरविली. |
| **100** | 119 | 2015 | प्रणब मुखर्जी | नरेंद्र मोदी | • 7 मे 2015 रोजी भारत व बांग्लादेश यांमधील 'भूसीमा करार' (Land Boundary Agreement) करण्यात आला. |
| **101** | 122 | 2016 | प्रणब मुखर्जी | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• GST (Goods and Service Tax) वस्तू व सेवा कर.<br>• 246-A हे कलम नव्याने समाविष्ट करण्यात येऊन याद्वारे संसद आणि राज्य राज्यविधानमंडळाला GST लागू करण्यासाठी कायदे करण्याचे अधिकार देण्यात आले.<br>• कलम-269A, 279A याद्वारे संविधानातील कलम-268A रद्द करण्यात आले.<br>• तसेच केंद्रसुचीतील विषय क्रमांक 92 आणि 92 C तर राज्यसुचीतील विषय क्रमांक 52 आणि 55 रद्द करण्यात आले. |
| **102** | 123 | 2018 | राम नाथ कोविंद | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• घटनादुरुस्ती अन्वये "राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला" (NCBC) घटनात्मक दर्जा देण्यात आला.<br>• पुढील 2 नव्या कलमांचा समावेश कलम- 338(B) व 342(A)<br>• स्थापना - राष्ट्रीय मागासवर्ग आयोग कायदा 1993 नुसार.<br>• यापुर्वी आयोगाला वैधानिक आयोगाचा दर्जा होता.<br>• आयोगाचे सध्याचे अध्यक्ष - भगवानलाल साहनी. |
| **103** | 124 | 2019 | राम नाथ कोविंद | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• या घटनादुरुस्तीने 'आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटनांना' (EWS) 10% आरक्षण देण्यात आले.<br>• EWS आरक्षण हे मागासवर्गीय समुहांना दिल्या जाणाऱ्या |

Swadhyay e Learning

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आरक्षणाहुन वेगळ्या असेल.<br>• EWS चे निकष केंद्र व राज्यांचे वेगवेगळे असू शकतात.<br>• दुरुस्तीने घटनमेध्ये कलम 15(6) आणि कलम 16(6) ही दोन उपकलमे जोडण्यात आली.<br>• आरक्षणाची अमंलबजावणी करणारे पहिले राज्य - गुजरात |
| **104** | 126 | 2021 | राम नाथ कोविंद | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• अनुसूचित जाती व जमाती समुदायाचे लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांतील आरक्षणाची मुदत पुढील 10 वर्षांकरिता वाढविली (2030 सालापर्यंत)<br>• कलम 334 मध्ये बदल – 1950 नंतर 80 वर्षांनी हे आरक्षण संपुष्टात येईल (याआधी 70 वर्षांनी असे होते)<br>• परंतु आंग्ल-भारतीय समुदायाची मुदत वाढविली नाही.<br>• याचा अर्थ लोकसभा व विधानसभेतील आंग्ल-भारतीय समुदायाचे आरक्षण रद्द केले आहे. |
| **105** | 127 | 2021 | राम नाथ कोविंद | नरेंद्र मोदी | • Type 3 घटनादुरुस्ती<br>• (मराठा आरक्षण केस संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय रद्दबातल ठरवण्यासाठी आणि) राज्य सरकारला त्यांच्या राज्यात मागासवर्गीय समूहांची यादी (OBC list) ठरवण्याचा अधिकार देण्यासाठी (restore) हि घटनादुरुस्ती करण्यात आली.<br>• दुरुस्तीने घटनेतील कलम 338 (B), 342(A), 366 या कलमांत बदल करण्यात आले.<br>• 15 ऑगस्ट 2021 पासून लागू |
| | | | | | |

Swadhyay e Learning